प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
आदेश क्रमांक-२६४सन २०२५, दिनांक-१९.०७.२०२५

पहा:- १) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची अधिसुचना क्रमांक ए-३९०२/२०२५, दिनांक- १७ जुलै, २०२५.

२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा (जिओसेल) आदेश क्रमांक १८१/२०२५ व १८२/२०२५, दिनांक १९ जुलै, २०२५.

३) जिल्हा न्यायालय, बुलडाणा (सांख्यिकी विभाग) आदेश क्रमांक-८९/२०२५, दिनांक १९ जुलै, २०२५.

४) जिल्हा न्यायालय, बुलडाणा (सांख्यिकी विभाग) आदेश क्रमांक-९०/२०२५, दिनांक १९ जुलै, २०२५.

५) महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरओ-१०५९/ ५३२९-९१७३-जे, दिनांक २८ ऑगस्ट, १९६१.

६) महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक एचसीटी १५७८/ १४२२ (४४०)-XI, दिनांक ३१ मार्च, १९८१.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ वरील मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे अधिसुचनेनुसार संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये या जिल्हयाचे न्यायिक आस्थापनेवर खामगांव येथे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी व २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालये नव्याने सुरु होत असल्यामुळे व श्री. व्ही.व्ही.पाटील, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे पदनाम २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव असे झाल्याने तसेच संदर्भ क्रमांक ४ अन्वये ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, खामगांव यांचे न्यायालयात न्यायिक अधिकारी यांची नियुक्ती न झाल्याने सदर्हु न्यायालय हे बंद करण्यात आले असल्याने त्या न्यायालयातील कर्मचारीवृंद कमी करुन व संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये नविन न्यायालयांकरीता संदर्भ क्रमांक ०५ व ०६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे नविन पदे निर्माण करुन त्या अनुषंगाने नियुक्ती व स्थलांतराबाबतचा आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

RL

अ. क्र.	कर्मचा-यांचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
०१	श्री. आर.व्ही.पहाडे, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयात कनिष्ठ लिपीक म्हणुन नुतन पदी.
०२	कु. एम.एस.हरदास, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयात कनिष्ठ लिपीक म्हणुन नुतन पदी.
०३	श्री. एम.एच.शेख, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयात कनिष्ठ लिपीक म्हणुन नुतन पदी.
०४	श्री. डी.आर.काळे, शिपाई, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयात शिपाई म्हणुन नुतन पदी.
०५	श्री. एस.डी.मैंद, शिपाई, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयात शिपाई म्हणुन नुतन पदी.

<u>सदरचा आदेश हा दिनांक २१.०७.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्वपासुन अंमलात येईल.</u>

उपरोक्त स्थलांतरीत कर्मचा-यांनी आपले पदाचा कार्यभार दिनांक १९.०७.२०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर द्यावा व आपले नुतन पदी पदग्रहण अवधी न घेता दिनांक २१.०७.२०२५ रोजीचे मध्यान्हापूर्वला रुजू व्हावे.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक श्री. एम.एच.शेख, २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयातील कनिष्ठ लिपीक व शिपाई यांचे प्रत्येकी एक पद व सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयातील शिपाई यांचे एक पद पुढील आदेशापावेतो रिक्त ठेवण्यात येत आहे. रिक्त ठेवण्यात आलेल्या पदाचे काम इतर कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात यावे.

उपरोक्त कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपले पदाचा सविस्तर कार्यभार पिठासीन अधिकारी यांचे मार्फत जिल्हा न्यायालयास आदेश दिनांकापासुन एक महिन्याचे आत न चुकता सादर करावा.

19 JUL 2025

19/07/2025
(आर.एन.रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक/आस्था./ ३९४३ /२०२५, दिनांक-१९.०७.२०२५
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

०१) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव.

०२) अधीक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०३) वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / आस्थापना विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०४) सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

०५) कार्यालय प्रत.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बुलडाणा